आमदार सतेज उर्फ बंटी पाटील हयांना उपजतच समाज कार्यांची आवड आहे . हे बाळकडू त्यांना वडिल पद्मश्री डॉ . डी . वाय . पाटील यांच्याकडून मिळालेले आहे . आमदार होण्याआधीच्या कालवधीत हाती सत्ता नसताना देखील त्यांनी समाजातील गरीब अडचणीत सापडलेल्या आणि अन्याय झालेल्या लोकांना उत्स्फुर्तपणे मदत करून संकटमुक्त केलेले आहे त्यांच्या ठायी असलेला दीनदुबळयांबद्दलचा कळवळा,त्यांच्या बद्दलचा आदर यामुळेच गत विधानसभेच्या निवडणूकीत लोकांनी त्यांना आपला एक हक्काचा आधार म्हणून निवडून देउन आपली कृतज्ञता व्यक्त केली .

आपल्या आमदारकीच्या गेल्या पाच वर्षात त्यांनी समाजपयोगी अनेक कार्य केलीत . आपल्या मतदारसंघाचाच नव्हे,तर इतरांचा विकास साधण्याचा प्रयत्न केला . आपल्या अखत्यारित शैक्षणिक संस्था,दवाखाना,इत्यादींचा सर्वसामान्यासाठी उपयोग करून दिला . भागाच्या विकासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी सोडवल्या . त्यांना जमेलतेवढी आर्थिक मदत केली . काही विद्यार्थ्यांना दत्तक घेउन त्यांच्या शिक्षणाचा भार उचलला . खिशाला रोजगार मिळवून दिला .

त्यांनी प्रत्येक काम निरागसतेने आणि निस्वार्थी,निरपेक्षबुध्दीने केले . सतत हसतमुख चेहऱ्याचे आम . बंटी पाटील रात्र असो वा दिवस समाज कार्यात गढून गेलेले असत . अडीअडचणीच्या प्रसंगी कुणीही त्यांच्याकडे गेला तर तो विन्मुख कधीच परतत नसे . त्यांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्ती झाली नाही असं कधीच घ्डत नाही . त्यामुळे लोक त्यांच्यावर मनापासून प्रेम करतात .

त्यांचं विद्यार्थीप्रेम, शैक्षणिक संस्थाना मदत करण्याची प्रवृत्ती,असाध्य रोगांनी पिडीत असलेल्या लोकांवर योग्य ते उपचार होण्यासाठी त्यांनी पराकाष्ठेचे प्रयत्न केले . सत्तेची नशा काही औरच असते . ही नशा चढलेला माणूस जमिनीवर नसतोच, हवेत तरंगत राहतो . आणि म्हणूनच ज्यांनी आपल्याला सत्ताा दिली,त्या आपल्या मतदारांनाच विसरून जातो . पण आम . बंटी पाटील आमदार होउनही जमिनीवर राहिले . त्यामुळेच त्यांची आणि त्यांच्या मतदारांची नाळ तुटली नाही . आणि एक आमदार म्हणून ते यशस्वी ठरले . एक निरागस,निस्वार्थी,उपजतच समाजसेवेचे व्रत घेतलेला धाडसी,तडफदार,आणि तरूणरक्ताचा हा माणूस कुठेही गेला तरी यशस्वी होई ल,लोकप्रियतेच्या शिखरावर जाउन पोहोचेल याबद्दल निदान मलातरी संदेह नाही .

अनंत तिबिले

(ऐतिहासिक लेखक)